6751.9

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१

ई-मेल आयडी :- comscea.pune@maharashtra.gov.in sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-५/अभि.धा.क्र.१२०/ E.V.M. मशिन मान्यता/६५९६/सन १६ दि.०५/११/१६

वाचावे :-

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७३ कब (११)
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ चे नियम २ (२), नियम ३(v),नियम३३, नियम ३४ आणि नियम ३९.
३. सिग्नल सर्किटस, पुणे यांचा प्रस्ताव दिनांक ०२.१०.२०१६

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७३ कब तरतूदीनूसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, निर्देशन, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणावर सोपविणेत आलेली आहे .आणि,

ज्या अर्थी कलम ७३ कब(११) अन्वये प्राधिकरण नवीनतम तंत्रज्ञान व विशेष ज्ञान यांचा वापर करून सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यास सक्षम आहे. आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३३ अन्वये इलेक्ट्रॉनिक व्होटींग मशिनचा वापर करून मतदान घेणेची तरतूद आहे. आणि,

ज्या अर्थी प्राधिकरणाने नवीनतम तंत्रज्ञानाचा वापर करून निवडणूका घेणेसाठी प्रथमतः इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि सिग्नल सर्किटस पुणे या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र उत्पादन करणा-या कंपन्याकडून भाडे तत्वावर त्यांचे मशिन घेऊन प्रायोगिक तत्वावर सहकारी संस्थांच्या निवडणूका पार पाडल्या असून प्रायोगिक तत्वावर झालेल्या यशस्वी निवडणूकानंतर राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकांचे मतदान भाडे तत्वावरील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. आणि,

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक ३ अन्वये सिग्नल सर्किटस, पुणे यांनी प्राधिकरणास दिनांक ०२.१०.२०१६ चा प्रस्ताव सादर केलेला असून त्या प्रस्तावाचे छाननी अंती इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मतदान घेणेसाठी पात्र असल्याची प्राधिकरणाची खात्री झाली आहे.आणि,

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ चे नियम ३४ नूसार इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रास राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने मान्यता देण्याची तरतुद आहे. आणि,

ज्याअर्थी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान घेणेबाबत आदेश / मार्गदर्शक सूचना प्राधिकरणाने निर्गमित करणे आवश्यक आहे,

त्याअर्थी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान घेणेसाठी प्राधिकरण खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे .

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (११) , महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ चे नियम ३ (v) व प्राधिकरणास समर्थ करणा-या सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकांच्या मतदानासाठी मल्टी-कॅटेगरी मल्टीपल व्होटींग, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, सिग्नल सर्किटस , ३/२६४ , श्रीयोग नवजीवन सोसायटी , वाडा रोड , राजगुरुनगर (खेड ) जि. पुणे नोंदणी क्रमांक १६३१०००३१०३०५४२८ या कंपनीने उत्पादित केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान घेणेस मान्यता देत आहे. या पुढे सदर आदेशाच्या दिनांकापासून ज्या संस्थेची निवडणूक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे घ्यावयाची आहे त्याबाबतचे आदेश निवडणूक निर्णय अधिका-यास व जिल्हा /तालुका /प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना निर्गमित केले जातील, त्याच संस्थेची निवडणूक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे घेणे अनिवार्य राहील, सदर आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. सदर मतदान यंत्राचे भाडे दराबाबतचे आदेश स्वतंत्रपणे अलहिदा निर्गमित करणेत येतील.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशानुसार .**

(डॉ.आनंद जोगदंड )
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति -

१)जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक , सहकारी संस्था (सर्व)
२)जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक साखर (सर्व)
३)जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा सहनिबंधक सहकारी संस्था , (सिडको)
४)जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा सहनिबंधक सहकारी संस्था (एमएमआरडीए)
५)जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा सहनिबंधक सहकारी संस्था (झोपुप्रा)
६)जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
७)जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) (सर्व)
८)जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोदयोग)(सर्व)
९)जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था (म्हाडा) १ , २
१०)जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था (मस्त्य) म.रा. , पुणे
११)प्रभाग / तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा सहाय्यक / उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
१२)मुख्य कार्यकारी अधिकारी , सिग्नल सर्किटस , ३/२६४ , श्रीयोग नवजीवन सोसायटी , वाडा रोड , राजगुरुनगर (खेड ) जि. पुणे

प्रत माहितीसाठी सविनय
मा.सहकार आयुक्त व निबंधक , सहकारी संस्था , म.रा.पुणे (माहितीस्तव)